# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर, पिन ४२३ १०९.

फोन नं.(०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in) (E-mail – purchase@sai.org.in)


## जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिनकरीता व भांडी धुणेसाठी लिक्वीड सोप खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक व नामांकीत कंपन्या यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष,अटी / शर्ती व ई-निविदेचे माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in./tender या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.10/ 02 /२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.20/02/२०२४ सायं ०५.०० वा पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

Hulwale
6.2.24

(तुकाराम देवराम हुलवळे)

प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीड सोप पुरविणेबाबत ई-निविदा सन २०२४ करीता

**A. निविदेचा तपशिल- श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीड सोप पुरविणेबाबत ई-निविदा सन २०२४**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावानेअदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखलाअगर GST Online Registration Receiptऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

**C. पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता पुरवावयाचे लिक्वीड सोपचे वर्णन / स्पेसिफीकेशन BOQ मध्ये दिलेले आहे. त्याप्रमाणेच लिक्वीड सोप पुरवावे लागेल.

२. निविदा फी रक्कम रु.३,४००/- व बयाणा रक्कम रु. १७,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.

**D. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि. १० / ०२ /२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. २० / ०२ /२०२४ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. लिक्वीड सोपचा पुरवठा करावयाचा अंदाजे तपशील BoQमध्ये देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन सदर निविदा Online सादर करावयाची आहे.

३. ई-निविदेसोबत फक्त मागणी केलेली कागदपत्रे Online सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. मागणी केलेले नसलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. २२ / ०२ /२०२४ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

**E. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS,TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर,पॅकिंग व फॉरवर्डिग खर्च,जकात,वाराई, हमाली, प्लास्टीक ड्रम/ बॅरल खर्च वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार/ प्रसादालय /कॅन्टीन विभागामध्ये पोहोचचे वाहतूक खर्च या सर्व बाबींचा ऑनलाईन दर भरतांना विचार करुन सर्व खर्चासह दर भरावेत.

...०२...

२. लिक्वीड सोपचा पुरवठा करण्यासाठी वापरलेले प्लास्टीक ड्रम/ बॅरल परत मिळणार नाहीत.

३. शासन नियमानुसार सध्या लागू असलेले व वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २%GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. पुरवठादाराने online निविदेत दर भरतांना काळजी पुर्वक भरावेत, नजरचुकीने दर भरले आहेत अशा सबबी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**F. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

२. कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**G. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या लिक्वीड सोपचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय, कॅन्टीन आणि भांडार विभाग बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल.

**H. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत सदर लिक्वीड सोपचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर लिक्वीड सोपचा पुरवठा पूर्ण केलेनंतर परत करण्यात येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही. निविदेत पात्र ठरलेल्या निविदाधारकाची बयाना रक्कम ३% सुरक्षा अनामत रकमेमध्ये वर्ग केली जाईल.

२. पुरवठादाराने शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

**I. साहित्याचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. सदर लिक्वीड सोपचा पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिलेपासून एक वर्ष राहील. लिक्वीड सोप प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे मागणीनुसार ०४ टप्प्याने ५० लिटरच्या ड्रम/बॅरल सह खरेदी करण्यात येईल. त्याप्रमाणे पुरवठाधारकास वर्षभर लिक्वीड सोपचा पुरवठा करावा लागेल.

२. लिक्वीड सोपचा पुरवठा दुरध्वनी/ईमेलव्दारे कळविलेनुसार दिलेले शेड्यूलप्रमाणे वेळेत पुरवठा करावा लागेल.

३. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठाकालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पूर्ण होईपावेतो गरजेनुसार मंजूर केलेले परिमाणाइतका अगर मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा लिक्वीड सोपची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या लिक्वीड सोपचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेले परिमाणाइतके सर्व लिक्वीड सोप खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

**J. साहित्याचा स्वीकार करण्याची पध्दत-**

१. मागणी केलेले सर्व साहित्य परिशिष्टात (BOQ) दर्शविलेल्या स्पेसिफीकेशन/ वर्णनाचेच पुरवावे लागेल. श्री साई प्रसादालय /कॅन्टीन विभागाकडील संबंधीत कर्मचा-यांनी पुरविलेल्या लिक्वीड सोपची तपासणी केल्यानंतर पुरवठा आदेशातील Specification प्रमाणे असल्यासच ते स्विकारले जाईल. वेगळयाच प्रकारचे, कमी दर्जाचे लिक्वीड सोप असल्यास ते स्विकारले जाणार नाही व ते स्वखर्चाने तात्काळ परत घेवून जाणे आपलेवर बंधनकारक राहील. ते परत न नेल्यास वत्याचे नुकसान झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

२. पुरवठा करीत असलेल्या लिक्वीड सोपची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन लिक्वीड सोप स्विकारले जाईल. तथापी लिक्वीड सोप स्विकारलेनंतरही एखादा लॉट अथवा ड्रम /बॅरल मधील लिक्वीड सोप खराब आढळल्यास सदर लिक्वीड सोप स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

३. ई-निविदेतील Specification / वर्णनाप्रमाणेच लिक्वीड सोपचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे. लिक्वीड सोपचे प्रती लिटरचे दरामध्ये ५० लिटरच्या ड्रम/बॅरलसह सर्व कर, GST, हमाली, वाराई, तसेच शिर्डी संस्थानचे श्री साई प्रसादालय / कॅन्टीन / भांडार विभागात पोहोचचे वाहतूक खर्चाचा समावेश राहील. इतर कुठलाही खर्च स्वतंत्र आदा केला जाणार नाही. लिक्वीड सोप उतरविण्याची वाराई(हमाली) पुरवठाधारकास द्यावी लागेल.

४. मंजूर झालेल्या दराने लिक्वीड सोपचा पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही किंवा मागता येणार नाही.

**K. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१ श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागास गरज भासल्यास लिक्वीड सोपची लॅब तपासणी सदर विभागाकडून करण्यात येईल. लॅब तपासणीचा अहवाल पुरवठा आदेशातील स्पेसिफीकेशनप्रमाणे नसल्यास उचित दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**L. बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या लिक्वीड सोपचे बील त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. बील संस्थानकडे सादर केलेपासून श्री साई प्रसादालय / कॅन्टीन विभागांचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर साधारणत: ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापी तांत्रिक कारणांमुळे बील आदा करण्यास विलंब झाला तरीही पुरवठा थांबविता येणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले लिक्वीड सोप संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून लिक्वीड सोप खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन केली जाईल.

४. शासन नियमानुसार कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**M. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील लिक्वीड सोप मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या लिक्वीड सोपचीकिंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या लिक्वीड सोपचीकिंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. लिक्वीड सोपची मागणी ई-मेल / दूरध्वनीवरुन कळविल्यानुसार वेळेत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशा इतके लिक्वीड सोप दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या लिक्वीड सोपसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या लिक्वीड सोपच्या बिलातून वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मागणी/ वर्णनाप्रमाणे व मंजूर दराने लिक्वीड सोपचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने लिक्वीड सोप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा लिक्वीड सोप पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेर निविदा मागणी करुन लिक्वीड सोप खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल करण्याबाबत संस्थानने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक लिक्वीड सोपचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. साथीच्या रोगामुळे शासनाकडून लॉकडाऊन केल्यास व त्यामुळे संस्थानकडे पुरविलेले लिक्वीड सोपची संस्थानला गरज नसल्यास लॉकडाऊन कालावधीमध्ये संस्थानकडे शिल्लक असलेले लिक्वीड सोप पुरवठादाराला परत स्वीकारावे लागेल.

**N. निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या शेवटच्या तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

**O. सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/ कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात लिक्वीड सोप पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या सोपचे ५० टक्के परिमाणाइतका लिक्वीड सोप पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण लिक्वीड सोपचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

४. पुरवठादाराने लिक्वीड सोपचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर याबाबत संस्थान जो निर्णय घेईल तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार चालणार नाही.

५. कोणतीही निविदा अंशतः/पूर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक नाही.

६. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

७. तांत्रिक निविदेसोबत संस्थानने ऑनलाईन मागविलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे ऑनलाईन सादर करु नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

८. खरेदीची ई-निविदा प्रक्रिया ही महाराष्ट्र शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल.

९. निविदेतील साहित्याचे Specification बाबत अगर निविदेबाबत अधिक माहिती हवी असल्यास कृपया ०२४२३-२५८७७१ अगर ०२४२३-२५८७७२ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल करणे, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही,

Hulwale
6/2/24

(तुकाराम देवराम हुलवळे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- --------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२४

ठिकाण :- निविदाधारकाची सही व शिक्का

## अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) ☐

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement ☐

३. पॅन कार्ड ☐

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

दिनांक- ---------------

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीड सोप पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले लिक्वीड सोप आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे श्री साई प्रसादालय / कॅन्टीन / भांडार विभागात पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा आदेशाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख/NEFT द्वारे भरणा करु. याकामी बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत लिक्वीड सोप वेळेवर शिर्डी येथील श्री साई प्रसादालय / कॅन्टीन / भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

## SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

**Requirement of the Liquid soap (BOQ)**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Inclusive of all Taxes & Expenses Per Litre | All Inclusive Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Liquid Soap -**<br>Neutral Grade - (PH-7.8 TO 8.5)<br>Concentration / क्षमता- १ लिटर लिक्वीड सोपमध्ये १० लिटर पाणी (Capacity :- 1 Ltr.Liquid soap in 10 Ltr.Water)<br>Purpose :- For Dish Washing Machine and Manual Dish Wash<br>Packing:- 50 Litres Plastic Drum<br>To Be supplied in 4 Quarters | 28,200 | Litres | | |

Hulwale
6.2.24

(Tukaram Deoram Hulwale)
I/c Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi